Historicity Research Journal
ISSN : 2393-8900

Impact Factor : 1.4152 (UIF)
Volume - 3 | Issue - 2 | October – 2016

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांनी बांधलेले तलाव

**प्रा.आर. एम .संगशेट्टी**
संगमेश्वर कॉलेज, **सोलापूर**




मध्ययुगीन कालखंडामध्ये भारताच्या इतिहासामध्ये ज्या तेजस्वी विरंगणा होऊन गेल्या, त्यांच्यामध्ये अहिल्याबाई होळकरांचे स्थान आदरणीय आहे. अहिल्याबाईचा जन्म १७२५ साली मराठवाडा विभागातील चौंडी या गावी झाला. जन्माने मराठी असणाऱ्या या कन्यारत्नाने आपल्या धार्मिक व सामाजिक कर्तृत्वाने भारतभर किर्ती मिळवली. यांचा विवाह मराठी सत्तेचे सुभेदार मल्हारराव होळकर यांचा पुत्र खंडेराव होळकर सोबत १७३३ मध्ये झाला, पण दुर्दैवाने अहिल्याबाई होळकरांवर घात घातला, वयाच्या अवघ्या ३० व्या वर्षी इ.सन १७५९ मध्ये खंडेराव होळकरांचा मृत्यु झाला. व अहिल्याबाईना अकाली वैधव्य आले. पुढे इ.सन १७६६ मध्ये त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांचे निधन झाल्यामुळे राजकारभाराची सर्व जबाबदारी अहिल्याबाई यांच्यावर आली. अशा बिकट परिस्थितीत मोठ्या धैर्याने अहिल्याबाईने दौलतीचे रक्षण तर केलेच, परंतु मल्हाराव होळकरांचा लौकिक कायम राखला. तिने राज्याची घडी विसकटू दिली नाही. तर होळकर शाहीचे वैभव कायम राखले, व अनेक सतकृत्ये करुन पुण्यश्लोक होण्याचा मान ही त्यांनी मिळविले.

अहिल्याबाई होळकरांनी केलेल्या सत्कृर्त्याची यादी फार मोठी आहे. अहिल्याबाई शिवभक्त होत्या. त्यांनी देशभर किती मंदिराचा जिर्णोदार केला. आनंद काकन येथील विश्वेश्वराच्या मंदिराचा जिर्णोदार केला. काशी येथील विश्वेश्वराच्या मंदिराच्या जिर्णोदार केला. गया येथील विष्णू मंदिर सोमनाथ, येथील महादेवाच्या मंदिरांचा जिर्णोदार केला.तर मराठवाड्यातील परळी वैप्पनाथ व वेरुळ येथील घृणेश्वर मंदिरांचा जिर्णोदार केला. याशिवाय भारतामध्ये अनेक ठिकाणी स्वतःच्या खर्चातून मंदीराची उभारणी केली, त्यामध्ये आयोध्यामध्ये श्रीराम मंदीराचे बांधकाम केले. आलामपूर, उजैन, ऋषिकेश, काशी, कुरुक्षेत्र, गंगोत्री, जेजूरी, नाशिक, पंढरपूर, चौंडी इत्यादी ठिकाणी मंदिराची उभारणी केली. या व्यतिरिक्त अनेक ठिकाणी मंदिरे बांधून वरिल सर्व ठीकाणी बारव व विहीरी तयार करून पाण्यासाठी व्यवस्था केली.

महासाधवी अहिल्याबाईने पाणी व्यवस्थापन क्षेत्रामध्ये संपूर्ण भरतामध्ये जे कार्य केले अशा तोडीचे कार्य अन्य कोणत्याही व्यक्तीने किंवा राज्यकर्त्याने केले नाही. जनकल्याण धर्म पारायणता व स्त्रीविषयी वाटणारी अनुकंपा, मुक्या प्राण्याविषयी असणारी कळकळ यामधून अहिल्याबाईने भारतभर दुर्गम ठिकाणी घाट बांधले. उदा- काशी कुरूक्षेत्र, प्रयाग, पुण्यतांबे, विटूर मंदलेश्वर, चौंडी या ठिकाणी घाट बांधले. तर बीड येथील जुन्या घाटाची दुरूस्ती केली.

प्रयाग या ठिकाणी बांधण्यात आलेला घाट अत्यंत विशाल आहे. तर १७८५ मध्ये माणिक कर्णिका घाट बांधल्याचे सापडते. पूरनियंत्रण भूसखलन प्रतिबंध पाणवठ्याची सोयी या भूमिकेतून त्यांनी देशभरात शेकडो घाट बांधले. ज्योतिर्लिंगाच्या मंदिराच्या दुरुस्ती करून त्या ठिकाणी कुंडाची व बारवाची निर्मिती केली.

परळी वैजनाथ मंदीर, आणि वेरुळच्या घृष्णेश्वर जवळ उभारलेली बारव आणि घृष्णेश्वर मंदीर हे मराठा कालखंडातील स्थापत्य व त्यांचा शौर्य विषयक दृष्टिकोन स्पष्ट करण्यास पुरेसे आहे. वेरुळ येथे बाईनी भारलेली बारवंची गणना भारतातील उत्तम बारव स्थापत्यास केली जाते. शिवाय निलाड, बद्रीनारायण, रावर, वंदावन ई. ठिकाणी मंदिरासोबत बारवाची निर्मिती केली. केदारनाथ येथे एक धर्मशाळा आणि पाण्याचा कुंड, बांधला. जो जमिनीपासून ३०० फूट उंच आहे. त्यांनी आपल्या व्यक्तीगत संपत्तीतून तसेच लोकांना आव्हान करुन ती निर्मिती केली. त्र्यंबकेश्वर येथे सुंदर अशी दोन देवाळाची निर्मिची करून व पाणी संवंधनातील दोन तलावे दगडाने बांधली आहे. अहिल्याबाईनी उभारलेल्या पाणी व्यवस्थापन पद्धतीपैकी ९० टक्के विहीरी बारव, तलाव आजही वापरत आहेत. त्यांनी आपल्या ३० वर्षाच्या कालखंडामध्ये त्यागाशी कर्माशी सांगड घालून जीवन व्यतीत करत. प्रजेच्या हिताकडे लक्ष देऊन भारतामध्ये धर्मशाळा व अनेक ठिकाणी अन्नछत्रे चालविली. प्रजेची सेवा केली, मुक्या प्राण्यावर त्यांचे प्रेम होते, म्हणून मुक्याप्राण्याला पिण्यासाठी त्यांनी हौद बांधले. यात्रेकरूसाठी वेगवेगळ्या रस्त्यावर पिण्याच्या पाण्याची सोय केली. या जनकल्याणासाठी केलेल्या कामावरुन त्यांना देवत्व दिले गेले इतकी त्यांची लोकप्रियता वाढत गेली. अहिल्याबाईने निर्माण केलेल्या पाणी व्यवस्थापनाच्या वारसा जतन करण्याची आज मात्र गरज आहे. मल्हारराव होळकरांनी मोठ्या काटकसरीने वागून पंधरा ते सोळा कोटी रुपये खाजगी संपत्ती जमा केली होती. त्याचाच वापर अहिल्यादेवीनी दान धर्म करण्यासाठी केला. अहिल्याबाईचा हा वारसा त्यांच्या नंतरच्या काळात होळकर घरण्यातील इतर राज्य पुरुषांनी चालविल्याचे दिसून येते.

या संबंधीचे तुकोजी होळकराने केलेल्या कार्यासंबंधीचे दोन शिलालेख उपलब्ध झाले आहेत. हा शिलालेख वडा तलाव या नावानेच ओळखले जाते. ते इंदोर जिल्ह्यातील देलापूर तालुक्यातील वडा तलाव या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गावीच आहेत. त्यानुसार (इ.सन १८६९) तुकोजी होळकराच्या आज्ञेवरून लालजी अंबाजी या सुभेदाराने तलावाची पाळी बांधल्याचे म्हटले आहे. त्या कामासाठी त्याला ५७९५१ रुपये खर्च आल्याची नोंद करण्यात आलेली आहे. दुसऱ्या शिलालेखामध्ये कार्याचा आरंभ कधी झाला व हे काम पूर्ण कधी झाले याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या नोंदीवरुन इ.सन १८३९ मध्ये कार्य सुरु झाले. व ते १८७५ साली संपले. अशाच प्रकारची नोंद मुल्हेर येथील किल्यावर केलेले आढळते. मुल्हेरच्या किल्यालाच मयरगड असे म्हटले जात होते. बारालावा प्रांताचा इतिहास तथा मुल्हेर देशमुखाची बखर या मुल्हेर मध्ये मुल्हेर येथील पाणी व्यवस्थापनाची माहिती दिलेली आहे. या माहितीनुसार मोसम आणि पांजरा या दोन नद्यांचा उगम साल्हेर जवळ होतो. असे म्हटले जाते की तेथे पडणाऱ्या पावसाचा एक थेंब मोसम नदीमध्ये तर एक थेंब पांजरा नदीमध्ये जातो. या नद्यांना जुळ्या बहिणीची उपमा दिली आहे. पाण्याच्या उपलब्धतेसाठी या दोन नद्यावर एकाखाली एक अशी दोन प्रचंड जलाशये निर्माण करण्यात आली होती. बागलाणच्या जल व्यवस्थापनाची प्रशस्ती ऐने अकबरीमध्ये केल्याचे नोंद आढळते. तसेच ताव्हर्निया या ब्रिटीश प्रवाशाने या जागेला भेट देऊन त्या जागेचे वर्णन लिहून ठेवलेले आहे. त्यानंतरच्या काळामध्ये भारतरत्न विश्वेश्वररांनी या जलाशयाची स्तुती केली असून यावर हुकूम म्हैसूर प्रांतामध्ये त्यांनी तलाव बांधले आहे. बांगलाणमध्ये अशा प्रकारच्या पाणी व्यवस्थापनाच्या कामासाठी ६००० एकर जमिनीवर पाटस्थळ उभारले आहे. त्यासाठी खोदलेल्या विहीरी मात्र बारमाही पाण्याने भरलेला आढळतात. या काळामध्ये खानदेशात पाणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात क्रांती घडवून आणली. नेर डांगरी, जापी, निमखेड, भरवली, बसबे, बुहाणपूर ददिवे, पाटणे, सोमपूर ठिकाणी पांजरा, कात,

बुराई गीरणा, ई. नद्यांवर बंधारे बांधण्यात आले. तसेच नाशिक, वेरुळ, जेजूरी, चांदवड, पंढरपूर, तुळजापूर, धुळे, बागलाण, ई. ठिकाणी मोठ्या प्रमाणात विहरी खोदण्यात आल्या. सन १८५० च्या काळात महाराष्ट्रामध्ये सिंचनासाठी २७४००० च्या आसपास विंधन विहीरी कार्यरत होत्या म्हणून या काळामध्ये महाराष्ट्रातील समाजाला जलसंधारणाचे व पाणी व्यवस्थापनाचे महत्त्व पटले होते. महाराष्ट्रात व त्याबाहेर ही बारव, तलाव, विहिरी, कुंड ई. उत्तम प्रकारे पाण्याची व्यवस्था केल्यामुळे तेथील जनतेचे पाण्याचे प्रश्न सुटले व आर्थिक क्षेत्रातही ही भरभराट ही झाली.

भारतात अतिशय प्राचीन काळापासुन तलाव निर्मित करण्याची परंपरा आहे. तलाव प्रामुख्याने जमीनीच्या खोलगट भागात निर्माण करण्याची प्रथा आहे. तलाव बहुधा, रानावनात, देवालयाच्या काठाशी अथवा गावकुसा बाहेर निर्माण करण्याची पारंपारिक प्रथा दिसून येते. साधारणतः पूर्वीच्या काळी जे तलाव निर्माण केले त्याचे बांधकाम वास्तुशास्त्राच्या दृष्टीकोनातून आकर्षक व मजबुत स्वरुपाचे आढळून येते. तलाव लोकांच्या सोयीसाठी बांधणे हे पूर्वीपासून धर्मशास्त्राच्या दृष्टीकोनातून पुण्य कार्य मानले गेले आहे. 'सामान्यतःजमिनीच्या खोलगट भागात नैसर्गिक वा कृत्रिमरित्या' झालेल्या जलाशयास काट, पाळ, शिल्पे इत्यादी बांधकामाने वास्तूदृष्ट्या जे आकर्षक स्वरुप दिले जाते त्यास तलाव म्हणतात. तलाव हे आकारमानाने सरोवरापेक्षा लहान व विहिरीपेक्षा मोठे असतात. तलावाला ताल, तालाब, तडाण, पुष्करणी, वापी, वापीका अशी भिन्न-भिन्न नावे आहेत. यापैकी काही नावे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. उदा- पुष्करणी म्हणजे कमळाचे श्तळे. आकार सादृश्यानुसार त्याचे सूर्य-पुष्करणी, चंद्र-पुष्करणी असे उपप्रकार आढळून येतात. भारतात नद्याप्रमाणे तलावांना धार्मिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. बहुसंख्य देवालयासमोर तलाव बांधलेले आढळून येतात. त्या भागात मोठ्या नद्या कमी तिथे देवळाच्या आवारात तलाव बांधत असत. या तलावाकाठी घाट, दिपमाळ, ओवऱ्या, स्तंभावल्या, महाद्वारे इत्यादी बांधण्याची प्रथा होती. सार्वजनिक उपयोगासाठी तलाव बांधणे हे जैं पुण्यप्रद कार्य समजले जायचे याच दृष्टीकोनातून पूर्वीच्या काळी तलावाची निर्मीती झालेली दिसून येते.

अहिल्याबाई या मुळातच धार्मिक वृत्तीच्या होत्या. जनसामान्याच्या सोयीसाठी त्यांनी विहीरी, कुंड, धर्मशाळा, देवालये, घाट, तलाव इत्यादीची निर्मिती केली. खालील ठिकाणी तलावाची निर्मिती केलेली आढळून येते. १. जेजूरी - महाराष्ट्र, २. त्र्यंबकेश्वर - महाराष्ट्र, ३. चांदवड - महाराष्ट्र, ४. परळी वैजनाथ - महाराष्ट्र, ५. ओंकारेश्वर - महाराष्ट्र

### पुण्यश्लोक अहिल्याबाईनी बांधलेला जामघाट येथील तलाव –

पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी ज्या प्रमाणे सामान्य जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी विहीरी अनेक ठिकाणी बांधल्या त्याच प्रमाणे पिण्यासाठी व शेतीसाठी लागणाऱ्या पाणी पुरवठयाची गरज ओळखून देशात अनेक ठिकाणी तलाव बांधले. इंदौर व माहेश्वर यांच्या दरम्यान विद्यचल पर्वताच्या व सातपुडा पर्वताच्या काही रांगा आहेत. त्यात एक जामघाट नांवाचे प्रसिद्ध असे ठिकाण आहे. या ठिकाणी अहिल्याबाईनी एक सुंदर दरवाजा व तलाव बांधला आहे. या घाटात एक दरवाजा आहे. हा दरवाजासुमारे २५ यार्ड लांब व २२ यार्ड रुंद व ४० ते ५० फुट उंच आहे. या दरवाज्याच्या दोन्ही बाजूस भव्य खांब आहेत. दुसऱ्या मजल्यावर सज्जे आहेत. दक्षिणेकडील भिंतीस तीन खिडक्या असून त्यातून खाली २००० फूट नर्मदा नदी वहात असलेली दिसते. या दरवाजाच्या माथ्यावर एक चौरस ओटा असून त्यावर शामीयाना लावता यावा म्हणून त्यास भोके केली आहे. या ओट्यावरुन विंध्य व सातपुडा या पर्वतांच्या पसरलेल्या भिंती, घनदाट अरण्ये, हिरवी गार शेती, नर्मदा नदीचे वहात असलेले पवित्र पाणी वगैरे फारच उत्तम देखावे दिसतात. या दरवाज्यावर पुढीलप्रमाणे लेख आहे-।। श्री गणेशाय नमः स्वस्ती श्री विक्रमार्थ संवत १८४७ सप्तृब्धि नागभुराके १७७२ युग्म कुसप्ते कयिते दुयिते वत्सरे माघे शुक्ल गयो दर्या पुष्पके बुधवारो स्नुष्य गळहारी रावस्य खडी रावस्य वल्लग शिवपुजा पर नित्य ब्राम्हण धर्म तत्परा अहल्या रव्या बबधेद मार्गद्वार शोभनम या संस्कृत

शिलालेखाचा मराठीत अर्थ- श्री गणेशाय नमः स्वस्ती श्री विक्रमार्थ संवत १८४७ शके १७१२ दुभती नाम संवत्सरे माघ शुक्ल त्रयोदशी पुष्प बुधवार या दिवशी मल्हाररावांची स्नुषा व खंडररावीच धर्म पत्नी जी नेहमी शिवपूजा पारायणासाठी व ब्राम्हणांना धर्म करण्यात तत्पर आहे. या अहिल्याने हे सुंदर महाद्वार बांधले. या दरवाज्यास गवाक्षे आहेत. त्यांच्या जवळ एक तलाव असून ती अहिल्याबाईच्या नांवानेच प्रसिध्द आहे।। लेखांक ५६ २ मे १७८४ ।। श्रीमंत राजश्री पंतप्रधान रावसाहेब स्वामींचे सेवेसी विनंती सेवक कैसोभिकाजी दातार चरणावरी मस्तक ठेऊन शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीने ...... गंगा जल अहिल्याबाई होळकरही जमावसुध्दा जांबसे तलावाचे उद्यापनाकरिता आली आहेत. येथून महेश्वरी जावयाची आठ दहा रोज लागतील आणि समागमे आहो।।लेखांक ५५ २८ एप्रिल इ.स.१७८४ ।। चंद्र वीस जमादिलारवर सेवेसी कैसो भिकाजी दातार कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना नाईत छ ७.... जांबाचे घाटावर तळे मोठे बांधले आहे तेथे बाई उद्यापन करावयास वैशाख शु, ।। शनिवारी जाणार गेली तर बरोबर जाईन ४ दिवस लागतील ।। अशा प्रकारे अहिल्याबाई होळकरांनी जांबघाटावर एक मोठा तलाव बांधला असून त्या तलावाच्या उद्यापनासाठी त्या स्वतः हजर होत्या. त्यामुळे भाविकासाठी पिण्याच्या पाण्याची व धार्मिक विधिसाठी पाण्याचा उपयोग सतत होत असे. त्याच प्रमाणे तेथील तळयामधील पाण्याचा वापर पिण्या बरोबरच शेतीसाठी ही केला जात असे.

### त्र्यंबकेश्वर येथील मोती तलाव -

अहिल्याबाई होळकर या शिवभक्त होत्या शिवालयाच्या ठिकाणी भाविकांच्या पिण्याच्या पाण्याची गैरसोय लक्षात घेऊन देशातील अनेक मंदिराच्या ठिकाणी तलाव व विहीरी बांधून भाविकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय केलेली दिसून येते. त्र्यंबकेश्वर हे एक पवित्र तिर्थ क्षेत्र असून ते नाशिकपासून वीस मैलावर आहे. बारा ज्योतीलिंगापैकी एक पवित्र शिवस्थान म्हणून तिर्थक्षेत्र प्रसिद्ध आहे. हे शिवालय नानासाहेब पेशव्यानी बांधले आहे. भव्य देवालय व विस्तीर्ण आवार असलेले व आजही सुरक्षित तटबंदी असलेले हे देवालय आहे. अहिल्याबाई होळकर ह्या शिवभक्त होत्या त्यांनी येथे एक महादेवाचे मंदीर बांधले व कुशवर्ताकडे जाण्यासाठी पूल बांधला याशिवाय यात्रेकरुंच्या सोयीसाठी एक तलाव बांधला जो मोती तलाव म्हणून ओळखला जातो. ।।श्री त्र्यंबकेश्वर नं.१८, मोती तलाव चिरेबंद पक्का बांधलेला आहे. ।। मोती तलाव आजही चांगल्या स्थितीत आहे. या तलावात आजही भरपूर पाणी आहे. पाण्यावर चार दगडी पायऱ्या दिसतात. संपूर्ण तलावाला चारही बाजूंनी दगडी बांधकाम केलेले आहे. होळकरांची जिथे मोतीबाग आहे तया ठिकाणी हा मोती तलाव बांधलेला आहे.

### ओंकारेश्वर येथील तलाव -

नर्मदेच्या काठावर तिच्या पात्रातील एका विशाल बेटावर नेमाड जिल्ह्यात भगवान शंकराच्या बारा ज्योर्तिलिंगापैकी चौथे प्रख्यात ज्योर्तीलिंग 'ओंकारम मलेश्वर' हे पवित्र तिर्थक्षेत्र आहे. येथील बेटाला व नर्मदा कावेरी यांच्या प्रवाहास ओम असा आकार निसर्गताच प्राप्त झालेला आहे. पर्वतावरील वनश्रीमुळे पर्वताचा ही आकार 'ओम' सारखाच दिसतो. ओममधील आकाराच्या ठिकाणी संगम आहे. तर उकाराच्या ठिकाणी ममलेश्वराचे देवालय आहे. अहिल्याबाई शिवभक्त असल्यामुळे भारतातील प्रमुख शिवालयाकडे त्यांचे लक्ष *जाणे* सहजीकरण .आहे. त्यामुळे ओंकारेश्वर येथील मंदिराचा जिर्णोदार तलाव, विहीर, कोटी लिंगार्चन पारखाना, देवाला दागिने पालखी इत्यादी धार्मिक व लोकोपयोगी कामे त्यांच्याकडून येथे ही झालेली आहेत

या मंदिराच्या जिर्णोदारानंतर अहिल्याबाईने ज्योतीलिंग ममलेश्वर महादेव मंदीर ५०००० रुपये पक्के शिखर ट बांधले त्याचप्रमाणे जायदादीचे नांव ३१० तलाव अंदाजे किंमत १०००० ।। श्री ओंकारेश्वराहून अंदाजे अर्ध्या मैलावर आहे.

ओंकारेश्वर येथे अहिल्याबाई होळकरांनी बांधलेला तलाव आज देखील चांगल्या स्थितीत आहे. ओंकारेश्वरापासून जवळ एक कि.मी. अंतरावर असलेल्या होळकर ट्रस्टच्या शेत जमिनीजवळ हा तलाव आहे. तलाव चारही बाजूंनी काळ्या घडी दगडाची बांधलेली असून पाच पायऱ्या दिसतात. पाणी भरपूर आहे. तलावात उतरण्यासाठी चारही बाजूंनी पायऱ्या आहेत. तलाव मात्र आजही चांगल्या स्थितीत आहे. तलावाची लांबी रुंदी पुढीलप्रमाणे आहे. ।। दहा तलाव ओंकारेश्वर ते पश्चिम बाजूनी एक मैल लांब ४७०० रुंदी २८६ चारी बाजूंनी काळी जमीन किंमत १०००००० ।। पुर्वी ओंकारेश्वरास फुले वाहण्यासाठी ज्या शेतीतून फुले घेतली जायची त्या शेतीसाठी या तलावातून पाणी दिले जायचे. अशा प्रकारे ओंकारेश्वर येथील तलावामुळे सर्वसामान्य लोकांचे पिण्याच्या पाण्याचे प्रश्न मिटले. त्याच बरोबर शेतीलाही पाण्याचे व्यवस्थापन झाल्यामुळे मोठया प्रमाणात उत्पादन ही शेतीतून निघू लागले. त्यामुळे तिथल्या लोकांचा आर्थिक विकास झाल्याचे दिसून येते.

### चांदवड येथील तलाव -

चांदवड ही अहिल्याबाई होळकरांच्या जहांगीरीचे ठिकाण, चांदवड हे गांव नाशिक विदर्भाच्या रस्त्यावर असून होळकरांच्या स्वदेश विभागाचे प्रमुख केंद्र होते. १७५३ पासून चांदवडचा किल्ला मल्हाररांवाच्या ताब्यात आला. त्या रंगमहाला शेजारी होळकरांचा वाडा असुन अहिल्याबाई होळकरांनी चांदवड येथे अनेक ठिकाणी देवालय बांधली. त्यात रेणूका देवीचे देवालय प्रमुख आहे. ।। चांदवड वाफगांव रेणूका मंदीर चांदवड लांबी २०० रुंदी १०० पुर्वेला डोंगर पश्चिमेला आग्रारोड दक्षिणेला रस्ता उत्तरेला डोंगर किंमत अंदाजे रु.२५००० ।। या रेणुकादेवीच्या मंदीराशेजारीच अहिल्याबाईनी एक सुंदर तलाव बांधला आहे. परंतु या तलावाचे कागदोपत्री उल्लेख मात्र सापडत नाहीत. परंतु होळकर ट्रस्टचे मॅनेजर श्री एम के पवार यांनी चांदवडची माहीती सांगताना सांगितले की, हा तलाव अहिल्याबाईनी रेणुकादेवीच्या दर्शनार्थ येणाऱ्या भावीकांना स्नानासाठी व इतर वापरासाठी त्यांना बांधून दिला. हा तलाव काळ्या घडी दगडाने बांधलेला असून पाण्याच्यावर त्याच्या सहा पायऱ्या दिसतात. तलावातील पाणी घेण्यासाठी व दोन बांजूनी उतरण्यासाठी पायऱ्यांची योजना केलेली आहे. तलावात जिवंत पाणी आहे. आजपर्यंत कधीही पाणी आटले नाही. चारी बाजूंनी दगडांनी बांधलेली भिंत चांगली आहे. रेणुका देवीच्या मंदीरात तलावातून पाणी योजना केलेली आहे. अशा प्रकारे अहिल्याबाई होळकरांनी उत्तम प्रकारे या ठिकाणी पाणी व्यवस्थापन केल्यामुळे या परिसरातील लोकांचे पिण्याच्या पाण्याचे प्रश्न मिटले. त्याच बरोबर या तलावामध्ये भरपूर पाणी असल्यामुळे येथील शेतकऱ्यांना शेतीतील उत्पादन वाढवण्यासाठी फायदा झालेला दिसून येतो.

### जेजूरी येथे बांधलेले मल्हार तलाव -

जेजुरी हे महाराष्ट्रातील एक प्रसिध्द तिर्थक्षेत्र इथल्या टेकडीवरील पठार व गडकोट अशा दोन ठिकाणी खंडोबाची मंदीरे आहेत. खंडोबा हे होळकरांचे कुलदैवत असल्याने अहिल्याबाईनी त्यांच्या पुढील वंशजांनी वेळोवेळी जेजुरीला भेटी देऊन अनेक धर्म कृत्य केलेले आढळते. खंडोबाच्या मंदीरात एका खांबावर शिलालेख आहे. तो असा - ।। तुकोजी मल्हारजी होळकराने दिंडोरी येथील श्यामजी नारायण राजापुरकर यांच्या करवी स. १६९२ विकृती श्रावण शु.१ सोमवार (३०,१७७० जुलै २३) या दिवसापासून किल्ला व तळे यांचे काम चालू केले असे दिसते. गाभाऱ्यातील मेघडवरीस चांदीचे कवच आहे. त्यावरील लेखावरुन ते श.१६९७ श्रावण शुध्द ७ (इ.१७७५ ऑगस्ट ३) या वेळी रकमाजी

जाचक यांने करुन दिल्याचे समजते।। गावाच्या ईशान्यच्या मल्हार - गौतमेश्वराचे देवळावरील लेखात श.१७१२ साधारण अश्विन शुध्द १० (३.१७९० ऑक्टोंबर १७) मल्हार गौतमेश्वर, तुकोजी मल्हारजी होळकर असा तपशील आहे।। अहिल्याबाईने इ.स.१७४२ ते १७४४ या काळात मंदिराची बरीच डागडुजी केली।। जेजुरीचा खंडोबा हे होळकरांचे कुलदैवतच असल्यामुळे इतर तिर्थक्षेत्रावर ज्याप्रमाणे अहिल्याबाईनी कांही लोकोपयोगी कामे केली त्याप्रमाणे येथेही त्यांनी जेजुरी गांवापासून जवळच मोठा एक तलाव त्यास मल्हार तलाव म्हणुन संबोधले जाते. त्याची त्यांनी निर्मीती केली. ।। पत्रांक ३७ इ.स.१७९३ राजश्री सिधो बापूजी निस्बत कारखाना जेजुरी यास तुम्ही पत्र पठविले ते पाउन लेखनार्थ अवगत जाहला त्याची उत्तरे येणेप्रमाणे - डोंगराचे पाणी तळ्यात त्यातला कोरडी पाळ बांधावयास आशा जाहली त्याचप्रमाणे बांधली असता पाणलोटाचे भराणे वाहून गेली, संगीन बांधले खेरीज टिकणार नाही. म्हणोन लिहले त्यास संगीन कामाचे प्रयोजन नाही. पाळरुंद चांगली आठ-दहा हात धवून भोदून मात्र चुन्याचे दगड जमवून बसवणे म्हणजे ते वाहून जाणार नाहीत. आणि गाळही होऊ पावणार नाही, इकडे जाबेस वगैरे याप्रमाणेच तब्याची कामे केली आहेत. एकूण ४ केलेले यनन करुन लिहल्याप्रमाणे वर्तणुक करणे सर्वदा पत्र पाठवून करवण्यासंबंधी सविस्तर लेखन करीत जाणे आणि जे छ.२७ रविलाखर ।। तलाव मल्हार ट्यांक जायदादीचे क्षेत्रफळ ५१ गुंठे अंदाजे किंमत ८ लाख जागेचे वर्णन दगडी बांधलेला आहे।। हा तलाव मल्हार तलाव म्हणून प्रसिद्ध आहे. तो गौतमेश्वराच्या मंदीराच्या बाजूला आहे. बाजूलाच अहिल्याबाई होळकर ट्रस्टची बागायती शेती आहे. मल्हार तलावाची लांबी रुंदी व क्षेत्रफळ जवळपास ११ कि.मी. पेक्षा जास्त आहे. तलावाच्या भिंतीला अहिल्याबाईंनी पत्रात पाल म्हंटले आहे. ती पाल जवळपास २० फूट रुंदीची भक्कम आहे. आतील संपर्ण बांधकाम अतिशय रेखीव काळ्या दगडात बांधलेले आहे. तलाव चारी बाजूनी बंदीस्त आहे. तलावात उतरण्यासाठी पाच ठिकाणी पायऱ्यांची योजना केलेली आहे. प्रत्येक ठिकाणी २५ पायऱ्या बांधलेल्या आहेत. मोटाच्या जागा व पाणी ज्यात पडायचे त्याला माणे असे म्हणतात. ही जागा आजही सुस्थितीत आहे. तलावाच्या एका बाजूला खंदक दिसता. याला 10 जोडलेला आहे. त्यातून पाणी गावातील होळकर विहीरीत सोडले होते. व तेथून हे इतरत्र पुरविल जायचा तळ्यात आजही चांगले पाणी आहे. आतामात्र तिथे इलेक्ट्रीक मोटार बसवून पाणी योजना केलेली आह. एकंदरीत अतिशय चांगल्या व सुस्थितीत असलेला हा मल्हार तलाव स्थापत्यशास्त्र दृष्टीकोनातून एक अजाड नमना ठरावा तलावाच्या बांधकामावर शामजी नारायण यानी देखरेख केले. १७८० मध्ये म्हणजे २५ वषाना तलावाचे बांधकाम पूर्ण झाले.

अहिल्याबाईंनी जनसामान्यांच्या सोयीसाठी व शेतीच्या पाणी पुरवठ्यासाठी अनेक ठिकाणी तलावाची निर्मिती केल्याचे दिसून येते. उदा- जेजूरी येथील मल्हार तलाव, त्रंबकेश्वर येथील तलाव, चांदवड येथील तलाव, परळी वैजनाथ यथील तलाव, ओंकारेश्वर येथील तलाव, जामघाट येथील तलाव इ तलावाच्या माध्यमातून दुर्गम भागात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शेतीसाठी पाणी पुरवठा व धार्मिक ठिकाणी ही भाविकांची पाण्याची सोय व्हावी यासाठी तलाव बांधले. आजही त्या तलावातील पाण्याचा वापर यात्रेकरूंना, प्रवाशांना, शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांनाही होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे कार्य हे उल्लेखनीय आहे.

## संदर्भ

१. ओम प्रकाश वसंत नजन, अहिल्याबाई होळकर, साकेत प्रकाशन औरंगाबाद २००७

२. प्रा.गणेश मतकर, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, वंशातील इंदूरच्या राज्यकर्ता, श्री अहिल्या प्रकाशन इंदौर दिले २००७

३. पुरुषोत्तम रोहणकर, कर्मयोगी अहिल्याबाई होळकर, रेणुका प्रकाशन, अकोला २००७

४. प्रा.धनजय बेड्डे परिवर्तनाची गौरवगाथा लोकभाता अहिल्याबाई होळकर, विद्याभारती प्रकाशन लातूर फेब्रु २०००
५. रा.श्री.मोरवंचीकर भारतीय जलसंस्कृती स्वरुप आणि व्याप्ती सुमेरु प्रकाशन डोंबीवली प्रथम आवृती जूलै २००६
६. शास्त्री प.महादेव भारतीय संस्कृती कोष ९ वा खंड, प्रकारत भारतीय संस्कृती कोष मंडळ, ४१० शनिवार पेठ, पुणे - ३० प्रथमा आवृत्ती –
७. प्रा.शास्त्री अवधुत संपादक धर्म भास्कर अंक १ ला व २ मे जून १९७५, प्रकाशक ४ सुजीवन महंत रस्ता विस्तार विलेपार्ले, पूर्व मुंबई -
८. पारसनीस द.बा.महेश्वर दरबारची बातमी पत्रे, कारकिर्दी अहिल्याबाई होळकर भाग २२१, निर्णय सागर छापखाना इ.स.१९११.
९. गावडे शंकराव बाबुराव देवस्थान क्लासिफिकेशन लिस्ट हुजूर खासगी स्टेट इंदौर होळकर स्टेट प्रथमा आवृत्ती
१०. ट्रस्ट डीड ऑफ द खाजगी अहिल्याबाई होळकर चॅरिटज ट्रस्ट इंदौर डेटेड - २७ जून १९६२
११. ट्रस्ट डीड ऑफ द खाजगी अहिल्याबाई होळकर,
१२. जोशी पंडित महादेव भारतीय संस्कृती कोष खंडू तिसरा प्रकाशक भारतीय संस्कृती कोश मंडळ ४१३, शनिवार पेठ, पुणे प्रथमावृत्ती शके १८८६ सन १९६४
१३. जोशी तर्कतिर्थ लक्ष्मण शास्त्री संपादक, मराठी विश्वकोष.